दैनिक
# आकर्षण
गणपती बाप्पा मोरया
वर्धापन दिन
संपादक : विजय सांगळे

वर्ष ५ । अंक ७ । सोमवार २१ सप्टेंबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


## समाजातील महत्त्वाचा घटक म्हणून सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान - उपमहापौर ॲड. धनंजय जाधव

### मनपा सफाई कर्मचाऱ्यांच्या हस्ते सिद्धेश्वर तरुण मंडळाच्या गणपतीची महाआरती

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** गणेशोत्सवानिमित्त सिद्धेश्वर तरुण मंडळ जंगुभाई तालीम ट्रस्टच्या गणपतीची महाआरती महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. यावेळी सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान करून त्यांना गणपतीची महाआरती करण्याचा मान देण्यात आला.

यावेळी बोलताना उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, अहिल्यानगर महापालिकेचे सफाई कर्मचारी अहोरात्र ऊन, वारा आणि पावसाची पर्वा न करता शहराची साफसफाई करून स्वच्छता राखण्याचे महत्त्वपूर्ण काम करतात. त्यांच्या या कार्यामुळे शहरातील नागरिकांचे आरोग्य सुदृढ व निरोगी राहण्यास मोठी मदत होते.



त्यामुळे महापालिकेचा सफाई कर्मचारी हा समाजातील एक महत्त्वाचा घटक आहे.

गणेशोत्सवानिमित्त सफाई कर्मचाऱ्यांच्या हस्ते सिद्धेश्वर तरुण मंडळाच्या गणपतीची महाआरती करण्याचा मान देण्यात आला असून, त्यांच्या कार्याचा सन्मान करण्याचा हा एक प्रयत्न असल्याचे ॲड. धनंजय जाधव यांनी सांगितले.

यावेळी महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी सांगितले की, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी आम्हाला श्री गणेशाची

■ पान ४ वर

## नगरमधील विनायकनगर परिसरात गुटखा जप्त

### कोतवाली पोलिसांच्या कारवाईत एकास अटक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** विनायकनगर परिसरातील झारेकरी मोटर्स वर्कशॉपजवळ रविवारी (दि. २०) सायंकाळी कोतवाली पोलिसांनी गुटखा आणि एका दुचाकीसह एकूण ५२ हजार १८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, एका आरोपीला रंगेहाथ पकडले आहे.

कोतवालीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना गोपनीय बातमीदारामार्फत पुणे रोड परिसरातील विनायकनगर येथे एक व्यक्ती दुचाकीवरून गुटख्याची विक्री करण्यासाठी उभा असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे त्यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवाली पोलिसांच्या पथकाने अन्न व औषध प्रशासनाच्या () निरीक्षक एस. मुल्ला यांच्याशी संपर्क साधून घटनास्थळी संयुक्त छापा टाकला.

पोलिसांनी घटनास्थळी सुझुकी ॲक्सेस मोपेडवर पांढऱ्या रंगाच्या गोणीसह थांबलेल्या अन्सार अबरार सय्यद (वय ३३ वर्षे, रा. दर्गा दायरा, जि.प. शाळेजवळ, मुकुंदनगर) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडील गोणीची झडती घेतली असता, त्यात शासनाने प्रतिबंधित केलेला विमल गुटखा आणि व्ही-




१ तंबाखूचा साठा आढळून आला. पोलिसांनी गुटख्याचा साठा आणि वाहतुकीसाठी वापरलेली दुचाकी जप्त केली आहे. याप्रकरणी पोकॉ सुरज कदम यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात बीएनएस आणि अन्न व सुरक्षा मानके अधिनियम २००६ च्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर अधीक्षक वैभव कलबुर्मे, उपविभागीय अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, उपनिरीक्षक दीपक मेढे पोहेकॉ विनोद बोरगे, अतुल लाटे, सचिन लोळगे, रोहित ठोंबे, बागवान यांनी केली.

## पावनखिंडचा जिवंत देखावा पुढच्या पिढीला प्रेरणा व ऊर्जा देणारा ठरेल - आमदार संग्राम जगताप

### तोफखान्यात 'पावनखिंड' जिवंत देखाव्याचे उद्घाटन । बाजीप्रभू, वीर शिवा काशीद व मावळ्यांच्या शौर्याची गाथा देखाव्यातून साकार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे मोठे कार्य होत असून, समाजाला दिशा देण्याचे काम या उत्सवातून केले जाते. महाराष्ट्राला सण-उत्सवांची तसेच धार्मिकतेची मोठी परंपरा लाभली आहे. या माध्यमातून आपल्या संस्कृतीचे, इतिहासाचे आणि धार्मिक परंपरांचे जतन होत असते. सिद्धेश्वर तरुण मंडळ, जंगुभाई तालीम ट्रस्टचे संस्थापक राजू मामा जाधव यांनी देखाव्याच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य केले आहे, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

गणेशोत्सवानिमित्त तोफखाना येथे सिद्धेश्वर तरुण मंडळ, जंगुभाई तालीम ट्रस्टच्या वतीने 'बाजीप्रभू, वीर शिवा काशीद व मावळ्यांच्या रक्ताने पावन झालेली पावनखिंड' या जिवंत देखाव्याचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी मावळ्यांना सोबत घेऊन स्वराज्याची उभारणी केली. छत्रपती शिवाजी महाराजांचा हा इतिहास आजच्या युवा पिढीने जोपासणे गरजेचे आहे. पावनखिंडचा हा जिवंत देखावा पुढील पिढीला प्रेरणा व ऊर्जा देणारा ठरेल. हा देखावा पाहताना अंगावर शहारे आणणारा असून, गणेशभक्तांच्या नक्कीच पसंतीस उतरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, सिद्धेश्वर तरुण मंडळ, जंगुभाई तालीम ट्रस्टला ६६ वर्षांची परंपरा आहे. संस्थापक राजू मामा जाधव यांच्या माध्यमातून ही परंपरा पुढे सुरू आहे. गणेशोत्सवानिमित्त मंडळाच्या वतीने दरवर्षी विविध सामाजिक व ऐतिहासिक देखाव्यांचे आयोजन केले जाते.

यावर्षी 'पावनखिंड' हा जिवंत देखावा सादर करण्यात आला आहे. या देखाव्यातून छत्रपती शिवाजी महाराजांप्रती मावळ्यांचे असलेले प्रेम व निष्ठा अधोरेखित होते. कलाकारांनी उत्कृष्ट पद्धतीने सादरीकरण केल्यामुळे हा जिवंत देखावा नगरकरांच्या पसंतीस उतरेल, असे ॲड. धनंजय जाधव यांनी सांगितले.

देखाव्याच्या उद्घाटनप्रसंगी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, नगरसेवक निखिल वारे, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, विचार भारतीचे राजाभाऊ मुळे, सुधीर लांडगे, अशोक गायकवाड, पुष्कर तांबोळी, जितू गंभीर, नगरसेवक रवींद्र बारस्कर, रोहन सानप, अभिमन्यू जाधव,आदिनाथ जाधव,सोमनाथ जाधव, नगरसेवक मयूर बांगरे, अजय ढोणे, सुशांत जाधव, अभिजीत बोरुडे, मनोज ताठे, जालिंदर कोतकर,, ज्ञानेश्वर दौडकर, पुरुषोत्तम सब्बन,राहुल मुथा, अशोक फलके,शिवदत्त पांढरे,स्वप्नील अंकम, गणेश अष्टेकर, सचिन उदगीरकर, सचिन कांबळे, तुकाराम रामगिरी, रितेश दुगड, रुपेश दुगड,प्रवीण उदगीरकर, गणेश दिवाने,अक्षय संभार, बालाजी कोंडा, आकाश ताडला, राहुल गोंधळे, संदीप उदगीरकर, ओंकार बिडकर, राम खरगे, अवी नल्ला, तुषार पालाकृती, श्रीकांत उदगीरकर, किरण गोंधळे, समर्थ शिवरात्री, रुपेश येनगूपटला, निखिल बिल्ला, आशिष दांगडे आदींसह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आदिनाथ जाधव यांनी सिद्धेश्वर तरुण मंडळ व जंगुभाई तालीम ट्रस्टच्या कार्याची माहिती दिली. तसेच कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्या सर्वांचे आभार मानले.













## दै. आकर्षण निवडक

### गणेशमूर्ती, भक्तांची गर्दी आणि आकर्षक सजावटीचे चित्रीकरण करण्याची संधी; विजेत्यांना असंख्य रोख बक्षिसे



अहिल्यानगर - शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री विशाल गणेश मंदिर ट्रस्टच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त 'श्री विशाल गणेश रिल्स बनवा' या विशेष स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सवातील भक्तिमय वातावरण, श्री विशाल गणेशाची आकर्षक मूर्ती, भाविकांची गर्दी तसेच मंदिर परिसरातील सुंदर व आकर्षक सजावट यांचे कलात्मक चित्रीकरण करून ते एका मिनिटाच्या रिल्सच्या माध्यमातून सादर करण्याची संधी या स्पर्धेच्या माध्यमातून स्पर्धकांना मिळणार आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तरुणाईमधील रिल्स बनविण्याच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे आणि श्री विशाल गणेश मंदिरातील उत्सवाचे वैभव आधुनिक माध्यमातून सर्वांपर्यंत पोहोचावे, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे देवस्थानचे अध्यक्ष ॲड अभय आगरकर यांनी सांगितले. ही स्पर्धा दि. २०, २१ आणि २२ सप्टेंबर या तीन दिवसांच्या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी जास्तीत जास्त एक मिनिटांचा व्हिडिओ तयार करणे अपेक्षित आहे. या व्हिडिओमध्ये श्री विशाल गणेशाची मूर्ती, मंदिरातील दर्शनासाठी आलेले भाविक, उत्सवातील भक्तिमय वातावरण तसेच परिसरात करण्यात आलेली आकर्षक सजावट यांचा समावेश असणे अभिप्रेत आहे. त्यामुळे केवळ व्हिडिओ तयार करण्याऐवजी गणेशोत्सवाचे धार्मिक, सांस्कृतिक आणि उत्सवी वातावरण आपल्या कल्पकतेने रिल्सच्या माध्यमातून मांडण्याची संधी स्पर्धकांना मिळणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक रोख बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या स्पर्धकास ११ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास ७ हजार रुपये, तर तृतीय क्रमांकास ५ हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. त्यामुळे रिल्स बनविण्याची आवड असलेल्या युवक-युवतींसह सर्व इच्छुकांसाठी ही स्पर्धा विशेष आकर्षण ठरणार आहे. आपल्या कल्पकतेला भक्तीची जोड देत श्री विशाल गणेशोत्सवाचे चित्रीकरण करण्याची ही अनोखी संधी उपलब्ध झाली आहे. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून तो सामाजिक, सांस्कृतिक आणि कलात्मक अभिव्यक्तीचेही माध्यम आहे. बदलत्या काळानुसार सोशल मीडिया हे उत्सवातील विविध उपक्रम लोकांपर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी माध्यम ठरत आहे. याच पार्श्वभूमीवर श्री विशाल गणेश मंदिर ट्रस्टने रिल्स स्पर्धेचे आयोजन केले आहे. स्पर्धकांनी मंदिर परिसरातील शिस्त, पावित्र्य आणि धार्मिक वातावरणाचा आदर राखून व्हिडिओ तयार करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. ''श्री विशाल गणेशाच्या चरणी आपल्या कलागुणांची सेवा अर्पण करा आणि गणेशोत्सवाचे भक्तिमय क्षण आपल्या कल्पकतेने टिपा,'' असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी केले आहे. जास्तीत जास्त स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभागी होऊन श्री विशाल गणेशाच्या उत्सवाचे क्षण आपल्या कॅमेऱ्यात कैद करावेत आणि आपल्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून द्यावे, असे आवाहन देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी देवस्थान ट्रस्टने दिलेल्या ९६२३६७८५८७ या संपर्क क्रमांकावर संपर्क साधून आपला सहभाग नोंदवावा. गणेशोत्सवातील भक्ती, उत्साह, सजावट आणि श्री विशाल गणेशाचे वैभव एका मिनिटाच्या प्रभावी रिल्समधून सादर करण्याची ही संधी असल्याने शहरातील रिल्स क्रिएटर्स, युवक-युवती आणि छायाचित्रणाची आवड असणाऱ्या नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

# ढोकेश्वर विद्यालय परिसरात रोड रोमियोंचा बंदोबस्त करणार – सोमनाथ दिवटे

### ढोकेश्वर विद्यालयात गणेशोत्सवा निमित्त विद्यार्थ्यांना केले मार्गदर्शन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**टाकळी ढोकेश्वर–** शाळेत येताना व शाळा सुटल्यानंतर विद्यालयाच्या गेट परिसरात पोलीस नियमित गस्त घालतील. विद्यार्थिनींची छेड काढणाऱ्या रोड रोमियोंचा बंदोबस्त करून परिसरात शिस्त व सुरक्षित वातावरण निर्माण केले जाईल, असे प्रतिपादन पारनेर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी केले. श्री ढोकेश्वर विद्यालयात गणेशोत्सवा निमित्त पारनेर चे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे साहेब विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. ते पुढे बोलताना म्हणाले की विद्यार्थिनींनी किशोरवयात शिक्षण घेत असताना कोणताही घाईघाईचा निर्णय घेऊ नये, संयम बाळगावा आणि आपल्या आई–वडिलांचा तसेच कुटुंबाचा विचार करावा. ''लग्न हे प्रत्येकाच्या आयुष्यात येणारे महत्त्वाचे पर्व आहे; त्यामुळे अल्पवयात घरातून पळून जाण्यासारखा निर्णय घेऊ नये. शिक्षण पूर्ण करून योग्य वयात आणि योग्य निर्णयाने जीवनाची वाटचाल करावी,'' असा संदेश त्यांनी दिला.

यावेळी विद्यालयात प्रथम स. पो. नि. सोमनाथ दिवटे साहेब, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष बाबासाहेब खिलारी यांच्या हस्ते गणपती बाप्पाची आरती झाली. तसेच स्वास्थ्य दर्पण प्रतिष्ठान संचालित शांतीनिकेतन कॉलेज ऑफ फार्मसी धोत्रे बु! यांच्या वतीने दिला जाणारा ज्ञानज्योती पुरस्कार २०२६ विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांना मिळाला त्याबद्दल त्यांचा सन्मान विद्यालयाच्या सर्व सेवकांच्या वतीने करण्यात आला. यावेळी गोपनीय शाखेचे पोलीस किरण भापकर, पत्रकार बाळासाहेब गायकवाड, संतोष कोरडे, गणेश जगदाळे, श्रीनिवास शिंदे, प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, प्रकाश इघे, प्रा. अशोक गांगड, प्रा. नितीन ढोकळे, अतुल सैद, ग्रंथपाल संदीप खिलारी व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

गणेशाच्या आरतीचे नियोजन सोनल रोहकले, श्रीरंग धामणे यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब जाधव यांनी केले तर आभार प्रा.भाऊसाहेब हिंगडे यांनी मानले.

# देवस्थान इनाम धारकांचा एल्गार

### २७ सप्टेंबरला बोरमलनाथ देवस्थान दौंड येथे महामेळावा इनामी जमिनी असणार्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**पुणे** : राज्यातील देवस्थान इनाम धारक शेतकर्यांच्या इनामी जमिनीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राज्य सरकारने जून महिन्यात देवस्थान इनाम निर्मूलन कायदा २०२६ प्रस्तावित केला होता, परंतु इनामदारकांनी घेतलेल्या आक्षेपांमुळे सदर कायद्याचा मसुदा सरकारला वापस घ्यावा लागला होता. त्यानंतर महाराष्ट्र सरकारने देवस्थान इनाम निर्मूलन कायदा तयार करण्यासाठी राज्याचे महसूल विभागाचे सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली आहे येत्या डिसेंबर महिन्यात कायदा विधानसभेसमोर येणे अपेक्षित आहे. १९५३ साली इनाम अबोलिशमेंट कमिशन स्थापन झाले होते. त्यावेळी इतर सर्व इनाम जमिनी खालसा करून त्या त्या इनामदारकांच्या नावे केले गेल्या होत्या, परंतु देवस्थान इनाम जमिनी इनाम धारक शेतकर्यांना दिल्या गेल्या नाही. राज्यात विविध भागात देवस्थान इनाम संदर्भात विविध कायदे व नियम आहेत. त्यामध्ये एकसूत्रता नाही त्यामुळे राज्यातील देवस्थान इनाम धारक शेतकरी प्रचंड अडचणीत सापडलेला आहे त्यांना पीक कर्ज मिळत नाही पिक विमा मिळत नाही शासनाची कोणतीही मदत मिळत नाही, वारस नोंदणीचा प्रश्न देखील गंभीर झाला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर सरकारने आणलेलं कायदा हा २०११ पूर्वी अनधिकृत ताबा घेतलेल्या लँड माफियांच्या फायद्याचा होता.त्यामुळे या कायद्याबाबत इनाम धारक शेतकर्यांच्या मनात मोठी साशंकता आहे. देवस्थान इनाम जमीन कृती समितीच्यावतीने दिनांक २७ सप्टेंबर २०२६ रोजी बोरमलनाथ देवस्थान चौफुला दौंड येथे इनाम धारक शेतकर्यांच्या महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या शेतकर्यांना न्याय मिळवून देण्यासाठी देवस्थान इनाम कृती समिती प्रयत्नशील असून ब्राह्मण गुरव गिरी गोसावी बैरागी वैष्णव गोंधळी लिंगायत अशा विविध समाजातील इनामदार शेतकर्यांची ही कृती समिती तयार केली आहे. राज्यातील सर्व जिल्हाधिकार्यांना निवेदन व धरणे आंदोलन समितीच्यावतीने करण्यात आले आहे. शेतकर्यांच्या हिताचा कायदा तयार करण्यासाठी देवस्थान इनाम जमीन कृती समिती कार्यरत असल्याचे समितीचे समन्वयक ॲड. अण्णासाहेब शिंदे श्री. विश्वजीत देशपांडे, श्री. ओमप्रकाश गिरी, श्री. राजेंद्र बन यांनी सांगितले आहे.



देवस्थान इनाम जमीन कृती समितीच्या मागण्या : महाराष्ट्र राज्यातील देवस्थान इनाम वर्ग–३ जमिनींशी संबंधित शेतकरी व मूळ सनदधारकांच्या विविध समस्यांवर तातडीने उपाययोजना व्हावी, यासाठी 'देवस्थान इनाम जमीन कृती समिती'च्यावतीने खालीलप्रमाणे मागण्या सादर करण्यात येत आहेत.

इनाम खालसा व हक्क पुनर्स्थापित करणे : इनाम वर्ग–३ जमिनींचा इनाम तात्काळ खालसा करून या जमिनी मूळ सनदधारकांच्या (वंशपरंपरेने सेवा बजावणार्या पुजार्यांच्या/सेवाधार्यांच्या) नावे मालकी हक्काने वर्ग करण्यात याव्यात.

बेकायदेशीर हस्तांतरण रद्द करून ताबा मिळणे : देवस्थान वर्ग–३ जमिनी या अहस्तांतरणीय स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे या जमिनींचे झालेले सर्व बेकायदेशीर हस्तांतरण रद्द करून सदर जमिनींचा ताबा मूळ सनदधारक/सेवाधार्यांकडे पुनश्च सुपूर्द करण्यात यावा.

वारस नोंदी पुनरारंभ करणे : सक्षम न्यायालयाचा कोणताही स्थगिती किंवा प्रतिकूल आदेश नसताना रोखण्यात आलेल्या सर्व वारस नोंदी महसूल दप्तरी तात्काळ पूर्ववत सुरू करण्यात याव्यात.

कब्जेहक्क सदरी पूर्ववत नोंद घेणे : कोणताही वैध शासकीय आदेश नसताना महसूल अभिलेखात 'कुळचिटणीस' किंवा अन्य इतर हक्कांत घेतलेल्या नोंदी विलोपित (रद्द) करून सदर नावे पूर्ववत 'कब्जेहक्क' सदरी नोंदवण्यात यावीत.

शासकीय योजनांचा लाभ मिळणे : इनाम वर्ग–३ धारण करणार्या शेतकर्यांना इतर सामान्य शेतकर्यांप्रमाणेच शासनाच्या सर्व कल्याणकारी योजनांचा (उदा. पीक विमा, पीक कर्ज व इतर कृषी अनुदान योजना) लाभ मिळण्यासाठी पात्र ठरवण्यात यावे.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमातून वगळणे : मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० १९५० चा या जमिनींच्या थेटमालकीशी संबंध नसल्यामुळे, देवस्थान इनाम वर्ग–३ जमिनी या अधिनियमाच्या कार्यकक्षेतून पूर्णपणे वगळण्यात याव्यात.जमीन धारणा मर्यादा () रद्द करणे : देवस्थान इनाम वर्ग–३ जमिनींच्या संदर्भात लादण्यात आलेली १५०० चौ.मी.ची कमाल जमीन धारणा मर्यादा () तत्काळ रद्द करण्यात यावी. प्रलंबित विरासत कार्यवाही तात्काळ निकाली काढणे बाबत शासन निर्णय जाहीर करणे.

सदर संवेदनशील व प्रलंबित मागण्यांवर प्रशासकीय पातळीवर त्वरित सकारात्मक निर्णय घेऊन मूळ सनदधारकांना व शेतकर्यांना न्याय द्यावा, ही नम्र विनंती.

# नगर तालुका व शहर पतसंस्थांसाठी एक दिवसीय कार्यशाळेचे २२ सप्टेंबर रोजी आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नाशिक विभागातील नागरी ग्रामीण बिगरशेती सह.पतसंस्थांचे फेडरेशन लि.अहिल्यानगर, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन व अहिल्यानगर जिल्हा व तालुका पतसंस्था फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच जिल्हा उपनिबंधक व नगर तालुका उपनिबंधक कार्यालय सहकारी संस्था, अहिल्यानगर यांच्या सहकार्याने नगर तालुका व शहरातील संचालक मंडळ,अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा मंगळवार, दिनांक २२ सप्टेंबर २०२६ रोजी एडीसीसी बँक हॉल, चाहुराणा बुद्रुक शाखा,जि. अहिल्यानगर येथे होणार आहे.

या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्या हस्ते होणार असून,विशेष मार्गदर्शन उपनिबंधक प्रशांत सातपुते (सहकारी संस्था नगर तालुका) करणार आहेत.तर प्रमुख उपस्थिती म्हणून महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे चे अध्यक्ष काका कोयटे हे उपस्थित राहणार आहेत.या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून नाशिक विभागीय फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा,सेवानिवृत्त सहकार आयुक्त शैलेश कोतमिरे,सेवानिवृत्त सहनिबंधक तानाजी कवडे,संवाद कौशल्य, व्यक्तिमत्व विकास तज्ञ अनिरुद्ध देवचक्के आदी उपस्थित राहणार आहेत.

पतसंस्थांचे सहकारी कायदे व नवीन अद्यावत प्रणाली यांची माहिती होण्यासाठी या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातून पतसंस्थांच्या एकदिवसीय कार्यशाळेला प्रत्येक तालुक्यातून उस्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.या कार्यशाळेमुळे पतसंस्थांची निकोप कार्यपद्धतीत सुधारणा होऊन पतसंस्थांच्या विकासाला चालना मिळेल. नगर तालुका व शहरातील सर्व पतसंस्थांचे संचालक, अधिकारी व कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन

अहिल्यानगर जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष सबाजीराव गायकवाड,नगर तालुका पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष किसनराव लोटके, नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनचे संचालक उद्धवराव दुसुंगे यांनी केले आहे.

# आरास,देखावे, अन् पावसाच्या जलधारात रंगला.. बाळासाहेब देशमुख यांचा मानवतेचा धर्म.. कथाकथन प्रयोग



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संचारनगर गणेशोत्सव मंडळ ,लेखानगर सावेडी यांनी, कथा लेखक श्री बाळासाहेब देशमुख यांना कथाकथन साठी निमंत्रित केले. मंडळाचे पदाधिकारी राजेश थोरात यांनी सर्वांचे स्वागत केले. पदाधिकारी विक्रांत कंगे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. बाळासाहेब देशमुख यांनी प्रियाचे बाप्पाला मागणे... हा कथाकथन प्रयोग सादर केला. त्यात त्यांनी हजार पंधराशे लोकवस्ती असलेल्या ग्रामीण भागातील मानवतेचा धर्म सांगणाऱ्या, माणुसकीचा वसा पेरणाऱ्या , सखुबाईची कथा सादर केली.

आपल्या भव्य वाड्यातील एक रूम, गावात बदली होऊन येणाऱ्या शिक्षकांसाठी , ती मोफत राहावयास देते. गोरगरिबांच्या लेकुरवाळींसाठी तूप आणि शेपाचा लाडू देणारी सखुबाई , विद्यार्थ्यांना ताक दही वाटणारी सखुबाई, गावातील सासरी जाणाऱ्या मुलींना.. उतू नका,मातू नका. संसार अर्ध्यावर सोडू नका. दुसरे आई–वडील असणाऱ्या ,सासू सासर्यांची सेवा करा. हा गुरुमंत्र देणारी सखुबाई, अशी नाना रूपे बाळासाहेब देशमुख यांनी, आपली देह बोली,आवाज, संवादाचे चढ उतार ,अभिनयातून हुबेहूब सादर केली. आरास ,देखावे, आणि पावसाच्या जलधारात , हा अनोखा कथाकथन प्रयोग रंगत गेला. मंत्रमुग्ध करून गेला.

# गणेशोत्सवात पैठणकरांना मनोरंजनाची पर्वणी!

### हिंदूसुर्य महाराणा प्रताप गणेश मंडळाचा दणदणीत कार्यक्रमांचा नजराणा; जितू भाऊ परदेशी यांचे नागरिकांना आवाहन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** गणरायाच्या आगमनासोबतच पैठणमध्ये उत्साहाला उधाण आले असून, हिंदूसुर्य महाराणा प्रताप गणेश मंडळाच्या वतीने यंदा गणेशभक्तांसाठी विविध कार्यक्रमांची जंगी मेजवानी सज्ज झाली आहे. धार्मिक कार्यक्रमांसोबत समाजप्रबोधन, सांस्कृतिक उपक्रम, ऑर्केस्ट्रा आणि लावणीच्या कार्यक्रमांनी गणेशोत्सवाची रंगत आणखी वाढणार आहे. राजपूत समाज भवन, खंडोबा मंदिर मैदान, जुना नगर रोड, परदेशीपुरा येथे हे विविध कार्यक्रम रंगणार आहेत. धार्मिक वातावरणासोबत सामाजिक संदेश आणि मनोरंजनाचा संगम साधत मंडळाने पैठणकरांसाठी खास कार्यक्रमांची आखणी केली आहे. गणेशोत्सव हा केवळ उत्सव न



राहता धार्मिक श्रद्धेसोबत सामाजिक प्रबोधन आणि सांस्कृतिक जपणुकीचा उत्सव ठरावा, या उद्देशाने मंडळाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गणेशभक्त तसेच पैठण शहरातील नागरिकांनी या कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन नगरसेवक जितू भाऊ परदेशी यांनी केले आहे.

# पूर्ण तयारीनीशी प्रवेश परीक्षा द्या– इंजि. कैलाश दिघे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रामराव चव्हाण विद्यालयात प्रवेश परीक्षा व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून दिघे बोलत होते. ते पुढे म्हणाले की विद्यार्थ्यांनी प्रथम करिअरची दिशा ठरवणे गरजेचे आहे, त्या अनुषंगाने आवश्यक विषय, संबधीत प्रवेश परीक्षा आणि सर्वात शेवटी कोर्स, कॉलेज निवडावे.

यावेळी त्यांनी १२ वी नंतर विविध प्रोफेशनल कोर्सेससाठी आवश्यक असलेल्या सर्व प्रवेश परीक्षांची माहिती दिली. त्या साठी काय पात्रता असते, त्यांचे महत्व काय? याचे वेगवेगळ्या समर्पक उदाहरणांसह सखोल मार्गदर्शन केले. प्रत्येक विद्यार्थ्यांने सर्वच प्रवेश परीक्षा न देता मोजक्याच पण आपल्या आवडीच्या क्षेत्रातीलच परीक्षा द्याव्यात. अशा मार्गदर्शक सत्रांसाठी पालकांनीही उपस्थित राहणे आवश्यक आहे, असे आवाहन त्यांनी केले.



या सेशनमध्ये त्यांनी विद्यार्थी व शिक्षकांच्या प्रवेश परीक्षा संबंधीच्या सर्व शंकाचे निरसन केले. सर्व विद्यार्थ्यांना यशस्वी करिअरसाठी शुभेच्छा दिल्या.

रेणुका शिक्षण प्रसारक मंडळाचे रामराव चव्हाण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रवेश परीक्षा व स्पर्धा परीक्षा निःशुल्क मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन ॲड व इंजि कैलाश दिघे व संस्थेचे अध्यक्ष भिमाजी बबन कोकणे यांच्या हस्ते संपन्न झाले.

संस्थेचे अध्यक्ष कोकणे हे विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हणाले कोणतेही क्षेत्र असू द्या शिक्षणासोबत त्यातले कौशल्य अवगत करा. या कार्यक्रमासाठी उपाध्यक्ष सुरसिंग राव पवार, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ॲड व इंजि कैलाश दिघे, संस्थेचे सचिव ज्ञानेश चव्हाण, सहसचिव नितीन घाडगे, विद्यालयाचे प्राचार्य दरेकर, प्राथमिक विभागाचे प्राचार्य बोबडे, उच्च माध्यमिक विद्यालयाचे कळसे, नरोडे, सजन मॅडम, निंबाळकर मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते.काळे मॅडम यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक नरोडे, कळसे, आमराव मॅडम यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यालयाचे प्राचार्य दरेकर यांनी आपल्या मनोगतातून संवाद साधताना अपयशाने खचू नका, प्रयत्न करत रहा हा अनमोल संदेश विद्यार्थ्यांना दिला.

काळे मॅडम यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अत्यंत ओघवत्या शैलीत केले तर मान्यवरांचे आभार प्रदर्शन झिने मॅडम यांनी केले. यावेळी अकरावी, बारावीचे कला व विज्ञान शाखेचे सर्व विद्यार्थी, सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी उपस्थित होते. रामराव चव्हाण विद्यालयाच्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण होते.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### हिंदी पंधरवड्यानिमित्त गुलदस्ताचे कवी संमेलन उत्साहात

अहिल्यानगर- हिंदी पंधरवड्यानिमित्त रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटी (डिस्ट्रिक्ट ३१३२), आधार आपुलकी फाउंडेशन, अमर कविता सोशल फाउंडेशन आणि कवींच्या हक्काचे व्यासपीठ असलेल्या 'गुलदस्ता' साहित्य मंच यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी हिंदी शिकविणाऱ्या प्राध्यापकांचा हिंदी दिनानिमित्त सन्मान करण्यात आला.अहिल्यानगर शहरातील स्थानिक कवी, शायर तसेच साहित्याची आवड असणाऱ्या कलाकारांना आपल्या कलागुणांना वाव देण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने 'गुलदस्ता' कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील विविध कवींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या दर्जेदार कविता, शायरी व साहित्यिक रचना सादर केल्या. काव्य, शायरी आणि सामाजिक विषयांवरील संवेदनशील मांडणीमुळे कार्यक्रमाला रंगत आली. उपस्थित साहित्यप्रेमींनी काव्यमय वातावरणाचा मनमुराद आनंद घेतला. प्रमुख पाहुणे युनूस तांबटकर म्हणाले की तरुणाईला नकारात्मकतेतून बाहेर काढून देशाच्या प्रगतीसाठी सकारात्मक विचार करण्यास आणि योगदान देण्यास प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. भारत हा तरुणांचा देश असून या युवा शक्तीचा योग्य दिशेने उपयोग झाला तर देशाच्या विकासाला मोठी चालना मिळू शकते. कवी आणि शायर हे समाजातील परिस्थितीचे वास्तव आपल्या लेखणीतून मांडत असतात. त्यामुळे साहित्य आणि कलेला समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम म्हणून पाहिले पाहिजे. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या शायरी आणि भाषणांचा दाखला देत त्यांनी उत्तम वक्तृत्व, संयम आणि सकारात्मक विचारांचे महत्त्व अधोरेखित केले.रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटीचे अध्यक्ष डॉ. सईद शेख म्हणाले की, अहिल्यानगरसारख्या शहरात अनेक नवोदित कवी, लेखक आणि कलाकार आहेत मात्र आपल्या कलेचे सादरीकरण करण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध होत नाही. त्यामुळे अनेकांची कला त्यांच्या मनातच दडून राहते. 'गुलदस्ता'च्या माध्यमातून अशा कलाकारांना आपल्या भावना, विचार आणि कलागुण व्यक्त करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे.प्रत्येक व्यक्तीच्या अंगी कोणती ना कोणती कला दडलेली असते. त्या कलेला प्रोत्साहन, योग्य दिशा आणि सादरीकरणाची संधी मिळाली तर त्यातून उत्तम साहित्यिक व कलाकार घडू शकतात. केवळ मोठ्या शहरांमध्येच नव्हे तर स्थानिक पातळीवरील कवी आणि नवोदित कलाकारांनाही प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे. साहित्यिक कार्यक्रमांमुळे समाजात सकारात्मक विचारांची देवाणघेवाण होते, विविध विषयांवर संवाद निर्माण होतो आणि नव्या पिढीला साहित्याशी जोडण्याची संधी मिळते. त्यामुळे अशा सांस्कृतिक आणि साहित्यिक उपक्रमांना रोटरी क्लबच्या माध्यमातून सातत्याने सहकार्य केले जाईल, असे डॉ. शेख यांनी सांगितले.समाजोपयोगी तसेच सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी रोटरी क्लब सातत्याने प्रयत्नशील असल्याचे प्रास्ताविकात रवी डीक्रूज सांगितले. 'गुलदस्ता साहित्य मंच'च्या यशस्वी आयोजनासाठी संयोजक निखिल कुलकर्णी, हेमंत लोहगावकर ,रवी डिक्रुज यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटीचे सदस्य, पदाधिकारी, शहरातील साहित्यप्रेमी, कवी, कलाकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओमेगा नंदा यांनी केले, तर आभार निखिल कुलकर्णी व सचिव उदयभानसिंग परदेशी यांनी मानले.

### ॲड.प्रकाश कोठारी यांचे अकस्मात दु:खद निधन



अहिल्यानगर- नंदनवन नगर,बन्धन लॉनमागे, सावेडी येथील रहिवासी ॲड. प्रकाश देवीचंद कोठारी (वय ७३) यांचे २० सप्टेंबर रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने अकस्मात दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी २१सप्टेबर रोजी दुपारी १.३० वाजता नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या मागे पत्नी, सौरभ ,निखिल ॲड.प्रतिक ही मुले, नातवंडे, भाऊ डॉ .पारस, भावजया, १ बहीण असा परिवार आहे.ॲड.प्रकाश कोठारी हे हिंद सेवा मंडळाचे संचालक तथा भाई सथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ.पारस कोठारी यांचे मोठे बंधू तसेच चितळे रोड येथील प्रसिद्ध श्रीकृष्ण किराणा दुकान चे संचालक स्व. डी.आर.कोठारी उर्फ मामाजी हे त्यांचे वडील होते.

### सय्यद इसाक बापु यांचे निधन



अहिल्यानगर- हातमपुरा येथील मिलिटरीच्या ए सी सेन्टर मधिल निवृत मरहुम हाजी सैय्यद इसाक बापु वय ७६ वर्ष यांचे रविवार १३ सप्टेंबर २०२६ रोजी अल्पशया आजाराने निधन झाले. त्यांनी ए टी यु चाँद सुलताना हाईस्कूल, अहमदनगर मुसलीम वेल्फेअर फाउंडेशनच्या माध्यमातून अनेक सामाजिक कार्य केले. त्यांच्या पश्चात ४ मुली, मुलगा, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## श्री समर्थ प्रशालेत हिंदी दिवस उत्साहात साजरा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळ, अहिल्यानगर अंतर्गत असलेल्या श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला, सावेडी येथे हिंदी राष्ट्रभाषा दिवस उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात श्री समर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन, ईशस्तवन आणि स्वागतगीताने झाली. प्रशालेच्या मुख्याध्यापिका तथा प्राचार्या सौ. वसुधा जोशी यांनी प्रास्ताविकात हिंदी दिवसाचे महत्त्व विशद केले. हिंदी दिवस दरवर्षी १४ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. हिंदी ही देशाला एकत्र बांधणारी, संवाद सुलभ करणारी आणि राष्ट्रीय एकात्मता दृढ करणारी भाषा असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच हिंदी साहित्य समृद्ध करण्यामध्ये अनेक कवी व साहित्यिकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

यानंतर प्रमुख अतिथी सौ. श्रुती कुलकर्णी यांचा परिचय करून त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेचे महत्त्व अधोरेखित करणारी नाटिका सादर केली. तसेच हार्मोनियम व तबल्याच्या साथीने देशभक्तीपर गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विविध सांस्कृतिक सादरीकरणांमधून विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेप्रती असलेला आदर आणि अभिमान व्यक्त केला.

प्रमुख अतिथी सौ. श्रुती श्रीपाद कुलकर्णी यांनी आपल्या मनोगतात हिंदी भाषेचे राष्ट्रीय एकात्मतेतील स्थान स्पष्ट केले. हिंदी ही जनमानसाची, देशाची आणि एकतेची भाषा असून तिचा अभिमान प्रत्येकाने बाळगला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. तसेच संत कबीर, गोस्वामी तुलसीदास, हरिवंशराय बच्चन यांसारख्या साहित्यिकांनी हिंदी साहित्य समृद्ध केले असल्याचे नमूद करत विद्यार्थ्यांनी हिंदीचा दैनंदिन व्यवहारात अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना 'कदम मिलाकर' ही कविता वाचण्यास प्रोत्साहित केले.

या कार्यक्रमासाठी प्राचार्या सौ. वसुधा जोशी व पर्यवेक्षिका सौ. शारदा होशिंग यांचे मार्गदर्शन लाभले. हिंदी विभाग प्रमुख श्रीमती नारळे, सहाय्यक शिक्षिका सौ. योगिता कुलकर्णी व सौ. वैष्णवी साबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. अमोल बागुल यांनी विशेष परिश्रम घेतले, तर कु. स्वाती घुले यांनी आकर्षक फलकलेखन व कार्यक्रमपत्रिका तयार केली.

## विनीत बोरा यांची श्रद्धा आणि सेवाभाव प्रेरणादायी - वरुण चोपडा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्यावर नितांत श्रद्धा असलेला बोरा परिवार समाजातील गरजूंना मदत करण्यासाठी सदैव तत्पर असतो. धार्मिक कार्यासाठीही हा परिवार तन मन धनाने सेवा देत असतो. पर्युषण पर्व संवत्सरी आणि गणेशोत्सवानिमित्त बोरा परिवारातील धार्मिक व सेवाभावी व्यक्तीमत्व असलेल्या विनीत अजित बोरा यांनी ग्रामदैवत श्री विशाल गणपतीला सुवर्ण, हिरे, माणिक जडीत अलंकार अर्पण केले आहेत. श्रद्धा, भक्ती आणि समर्पण याचा संगम बोरा यांच्यात आहे. त्यांचे धार्मिक, सामाजिक कार्य सर्वांनाच प्रेरणा देणारे आहे, असे प्रतिपादन वरूण चोपडा यांनी केले.

विनीत अजित बोरा यांनी नुकतेच माळीवाडा येथील श्री विशाल गणपतीसाठी सुवर्ण, माणिक, हिऱ्यांनी साकारलेले २४ लाख रुपयांचे अलंकार अर्पण केले. या कार्याबद्दल बोरा यांचा विनीत बोरा मित्र परिवारातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी वरूण चोपडा यांनी आपल्या मित्राबद्दल भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी संजय बोगावत, पवन झंवर, गोपाल मालू, चिराग मेहता, आनंद काळे, रोहन मुथा (पुणे), योगेश बजाज (पुणे), निखील शिंगवी (पुणे), अमित झंवर (पुणे), ईश्वर बोरा आदींसह बोरा परिवारातील सदस्य उपस्थित होते.

विनीत बोरा हे नगरमधील प्रसिद्ध सराफ व्मयावसायिक तथा समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा यांचे पुतणे व हिंद सेवा मंडळाचे अजित बोरा यांचे सुपुत्र आहेत. विनीत बोरा हे सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक म्हणून आर्थिक क्षेत्रातही योगदान देत आहेत.

विनीत बोरा यांनी सांगितले की, आमच्या परिवाराला सामाजिक, धार्मिक कार्याची परंपरा आहे. हाच वारसा पुढे चालवण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न असतो. सध्या आनंदधाम परिसरात उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी महाराज यांचा समर्पण चातुर्मास सुरू आहे. त्यांच्याकडून धार्मिकता व अध्यात्मिकतेचे अनमोल मार्गदर्शन लाभत आहे. माळीवाडा येथील श्री विशाल गणपती नगरचे ग्रामदैवत आहे. गणेशोत्सवानिमित्त गणपतीसाठी मौल्यवान अलंकार देताना मनाला खूप समाधान लाभले. या कार्याबद्दल मित्र परिवाराने सत्कार करून आणखी सेवाभावी कार्य करण्याची प्रेरणा दिली आहे. गणपती बाप्पांची सेवा घडण्यासाठी आमच्या सर्व बोरा परिवाराने मला पाठबळ दिले.

## कपड्याच्या दुकानातील चोरीचा गुन्हा उघडकीस; आरोपी अटकेत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** एमआयडीसी पैठण पोलीस ठाणे हद्दीतील पिंपळवाडी येथील कपड्याच्या दुकानात झालेल्या चोरीचा गुन्हा पोलिसांनी उघडकीस आणला असून, आरोपीस अटक करण्यात आली आहे. संतोष ओंकार गायवाड (३३, रा. तलवाडा, ता. गेवराई, जि. बीड) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

पिंपळवाडी येथील कपड्याचे व्यापारी शेख रईस मंजूर (३३) यांच्या दुकानातून चोरी झाल्याप्रकरणी दि. १४ जुलै २०२६ रोजी एमआयडीसी पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. २२७/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३३१(४), ३०५(ए) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांनी आरोपी संतोष गायवाड यास दि. २० सप्टेंबर रोजी अटक केली. चौकशीत चोरीस गेलेल्या कपड्यांमध्ये विविध प्रकारचे पॅन्ट व शर्ट असल्याचे निष्पन्न झाले. तसेच आरोपीच्या नातेवाईकाकडून ५ हजार रुपये रोख जप्त करण्यात आले. आरोपीस न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यास १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील व एमआयडीसी पोलीस ठाण्याचे एपीआय भरत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार के. के. सिंगल (१३३९) पुढील तपास करीत आहेत.

## आरतीच्या निमित्ताने संतोष भाऊ ब्राम्हणे यांनी गणरायाकडे घातले साकडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**कोपरगाव–** गणेशोत्सव म्हणजे भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचा संगम. गणरायाच्या आगमनाने परिसरातील वातावरण भक्तिमय झाले असून विविध गणेश मंडळे आणि प्रतिष्ठानांमध्ये दररोज आरतीसह विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. याच निमित्ताने कोपरगाव शहरातील नावलौकिक असलेल्या साई देवा प्रतिष्ठान येथे काल आरतीचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला.

राष्ट्रीय श्रीराम संघाचे धर्मरक्षक संतोष भाऊ ब्राम्हणे यांच्या हस्ते गणपती बाप्पाची आरती करण्यात आली. आरतीच्या निमित्ताने संतोष भाऊ ब्राम्हणे यांनी गणरायाच्या चरणी साकडे घालत,



परिसरात चांगला आणि समाधानकारक पाऊस पडावा, शेतकरी बांधवांच्या शेतीला मुबलक पाणी मिळावे आणि सर्वांच्या जीवनात सुख-समृद्धी नांदावी, अशी प्रार्थना केली.

यंदा पावसाच्या परिस्थितीमुळे शेतकरी बांधवांसमोर अनेक अडचणी निर्माण होत असल्याने चांगला पाऊस पडण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे गणरायाने सर्वांवर कृपादृष्टी ठेवावी, शेतकऱ्यांच्या कष्टाला चांगले फळ मिळावे आणि परिसरात आनंदाचे वातावरण राहावे, यासाठी संतोष भाऊ ब्राम्हणे यांनी गणरायाकडे साकडे घातले.

यावेळी प्रतिष्ठानचे पदाधिकारी, सदस्य आणि परिसरातील भाविक उपस्थित होते. सर्वांनी भक्तिभावाने आरतीमध्ये सहभाग घेत गणरायाचे दर्शन घेतले. आरतीनंतर उपस्थितांनी गणपती बाप्पाच्या चरणी प्रार्थना केली. आरतीच्या कार्यक्रमामुळे साई देवा प्रतिष्ठान परिसरात काही काळ भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

## शिक्षणातून समाज घडविणारे शिल्पकार : डॉ. प्रकाश कोळपे



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील मोठी स्वप्ने प्रत्यक्षात आणण्यासाठी शिक्षणाची दारे त्यांच्या गावापर्यंत पोहोचविण्याचे काम करणारे डॉ. प्रकाश कोळपे हे कोपरगाव तालुक्याच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रातील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. समाजसेवा आणि शिक्षण या दोन मूल्यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी केलेली वाटचाल आज एका मोठ्या शैक्षणिक संकुलाच्या रूपाने उभी आहे. कोळपेवाडीच्या मातीतून सुरू झालेला त्यांचा प्रवास आज महाराष्ट्रातील विविध भागांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी देणाऱ्या डॉ. कोळपे नॉलेज सिटीपर्यंत पोहोचला आहे. कोळपेवाडी आणि सुरेगाव या परिसराला ग्रामविकासाची समृद्ध परंपरा लाभली आहे. कर्मवीर शंकरराव काळे आणि सहकार महर्षी शंकरराव कोल्हे यांसारख्या नेतृत्वाने या परिसराच्या विकासाला दिशा दिली. याच वातावरणातून सामाजिक जाणीव आणि समाजासाठी काम करण्याची प्रेरणा अनेकांना मिळाली. त्याच संस्कारांच्या भूमीतून डॉ. प्रकाश कोळपे यांची जडणघडण झाली.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर आई-वडिलांचे संस्कार, तसेच सार्वजनिक जीवनातील विविध मान्यवरांचा प्रभाव राहिला. वडील जानकू मास्तर कोळपे हे शिक्षक म्हणून कार्यरत होते. कबीरपंथी विचारांचा प्रभाव आणि समतेचे संस्कार त्यांच्याकडून डॉ. कोळपे यांना बालपणापासून मिळाले. पुढे डॉ. वसंत पवार यांच्यासोबत काम करताना शिस्त, जिद्द, चिकाटी आणि रुग्णसेवेची भावना त्यांनी आत्मसात केली.

वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा त्यांनी निर्णय घेतला. १९८३ मध्ये कोळपेवाडी येथे छोट्याशा जागेत आरोग्यसेवेची सुरुवात झाली. आर्थिक परिस्थितीची पर्वा न करता गरजू रुग्णांना सेवा देण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू राहिला. आरोग्यसेवेच्या या प्रवासातूनच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न त्यांच्या मनात अधिक ठळकपणे उभा राहिला.

ग्रामीण भागातील अनेक हुशार विद्यार्थी केवळ आर्थिक अडचणींमुळे उच्च शिक्षणापासून दूर राहतात, हे त्यांनी जवळून पाहिले. शहरात जाऊन शिक्षण घेणे प्रत्येक विद्यार्थ्याला शक्य नसते. त्यामुळे दर्जेदार शिक्षणाची संधी ग्रामीण भागातच उपलब्ध करून देण्याचा संकल्प त्यांनी केला. याच विचारातून २००८ मध्ये शैक्षणिक क्षेत्रात त्यांच्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. सुरुवातीला डी.टी.एड. महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळा, नर्सिंगचे शिक्षण, ए.एन.एम., जी.एन.एम., डी. फार्मसी, बी. फार्मसी आणि पुढे वैद्यकीय शिक्षणाच्या विविध संधी निर्माण करण्यात आल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या अभ्यासक्रमांसाठी दूरवर जावे लागू नये, हा या संपूर्ण उपक्रमामागील महत्त्वाचा विचार होता.

यातूनच डॉ. कोळपे नॉलेज सिटी या शैक्षणिक संकुलाची उभारणी झाली. आज हे संकुल केवळ इमारतींचा समूह नसून शिक्षण, आरोग्य आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा केंद्रबिंदू म्हणून विकसित झाले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शैक्षणिक सुविधा, प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर येथे भर दिला जातो.

डॉ. कोळपे यांच्या मते शिक्षणाचा उद्देश केवळ पदवी मिळविणे नसून विद्यार्थ्याला स्वतः च्या पायावर उभे करणे हा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच सामाजिक जाणीव, संविधानिक मूल्ये, आत्मविश्वास आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी यांची जाणीव करून देण्यावरही भर दिला जातो. 'चांगला डॉक्टर होण्यासोबत चांगला माणूस घडला पाहिजे', हा विचार त्यांच्या शैक्षणिक दृष्टिकोनातून जाणवतो.

विद्यार्थ्यांच्या अभ्यासाबरोबरच त्यांच्यातील क्षमता विकसित व्हाव्यात, स्पर्धात्मक वातावरणात ते टिकावेत आणि स्वतःच्या भविष्याची दिशा स्वतः ठरवू शकतील, यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. याच व्यापक विचारातून विकसित झालेला 'डॉ. कोळपे पॅटर्न' हा त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक अनुभवाचा एक भाग आहे. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेसोबतच आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व विकासाला या पद्धतीत महत्त्व दिले जाते.

या प्रवासात कुटुंबाची साथही तितकीच महत्त्वाची राहिली आहे. पत्नी सुरेखा कोळपे तसेच डॉ. धनंजय आणि डॉ. गंगासागर कोळपे यांचे योगदान संस्थेच्या उभारणीत राहिले. मोठे शैक्षणिक संकुल उभे करताना येणाऱ्या अनेक अडचणींवर मात करण्यासाठी कुटुंबाने दिलेली साथ महत्त्वाची ठरली. डॉ. धनंजय कोळपे यांनीही परदेशातील संधींपेक्षा आपल्या वडिलांनी उभ्या केलेल्या कार्याला पुढे नेण्याला प्राधान्य दिले.

डॉ. प्रकाश कोळपे यांच्या कार्यामागे केवळ संस्था उभारण्याचा उद्देश नाही, तर माणसं घडवण्याचा विचार आहे. त्यांच्या मते संस्था मोठी होण्यापेक्षा त्या संस्थेतून घडणारा विद्यार्थी आणि समाजासाठी काम करणारा माणूस महत्त्वाचा आहे. त्यामुळे शिक्षणासोबत संस्कार, सामाजिक बांधिलकी आणि सेवा या मूल्यांनाही त्यांच्या कार्यात स्थान मिळाले आहे.

आज कोळपेवाडीच्या मातीतून सुरू झालेली ही शैक्षणिक वाटचाल व्यापक रूप धारण करत आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांतून विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येत आहेत. अनेक विद्यार्थ्यांसाठी ही संस्था त्यांच्या भविष्यातील स्वप्नांना दिशा देणारे माध्यम ठरत आहे.

डॉ. प्रकाश कोळपे यांचा हा प्रवास सांगतो की, एखाद्या व्यक्तीच्या मनात निर्माण झालेला शिक्षणाचा विचार जर समाजाच्या गरजेशी जोडला गेला, तर त्यातून अनेक पिढ्यांचे भविष्य घडू शकते. डॉ. कोळपे नॉलेज सिटी ही त्याच विचारातून उभी राहिलेली वाटचाल आहे. शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संधी देण्याचे आणि समाजासाठी उपयोगी माणसं घडवण्याचे त्यांचे कार्य पुढील पिढ्यांसाठी निश्चितच महत्त्वाचे ठरणारे आहे.

विशाल लोंढे
कोपरगाव

## डॉ.आर.एच अत्तार यांच्या आर्थिक व्यवहार तंत्रज्ञानातील नाविन्यपूर्ण डिझाइनची भारत सरकारकडून पेटंट नोंदणी प्राप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**शेवगाव–** शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात कार्यरत असलेले सुनीताताई एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ मॅनेजमेण्ट, शेवगावचे संचालक डॉ.आर. एच अत्तार यांच्या नावाने सहसंशोधकांसह विकसित करण्यात आलेल्या "FINANCIAL PROCESSING DEVICE FOR SMART PAYMENT AND TRANSACTION CONTROL"या नाविन्यपूर्ण संकल्पनेला भारत सरकारची पेटंट डिझाइन नोंदणी प्राप्त झाली आहे.

हे डिझाइन आर्थिक व्यवहारांच्या प्रक्रियेसाठी वापरल्या जाणाऱ्या स्मार्ट पेमेंट/ डिजिटल व्यवहार उपकरणाच्या डिझाइनशी संबंधित आहे डॉ.अत्तार यांच्या या बौद्धिक संपदा नोंदणीमुळे आणि या क्षेत्रांमध्ये संशोधन व नवोपक्रमाला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विशेषतः डिजिटल आर्थिक व्यवहारांच्या वाढत्या वापराच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाधारित संकल्पनांना शैक्षणिक संशोधन आणि उद्योग क्षेत्रात महत्त्व प्राप्त झाले आहे. आधुनिक पेमेंट प्रणालीमध्ये , - , आणि इतर डिजिटल पेमेंट माध्यमांद्वारे व्यवहार स्वीकारणे, प्रक्रिया करणे आणि व्यवहाराची माहिती इलेक्ट्रॉनिक पद्धतीने हाताळणे यांना महत्त्व आहे. या पार्श्वभूमीवर आर्थिक व्यवहारांसाठी विकसित करण्यात आलेल्या उपकरणाच्या रचना, स्वरूप आणि उपयोगाशी संबंधित नाविन्यपूर्ण डिझाइनला विशेष महत्त्व प्राप्त होते.

या डिझाइन नोंदणीबद्दल डॉ. अत्तार यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. एकनाथराव ढाकणे, सचिव जयवंता रहाणे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. श्रीकांत ढाकणे, खजिनदार प्रा.ऋषिकेश ढाकणे, प्राचार्य अंबादास डोंगरे, उपप्राचार्य प्रविण नागरगोजे, विभागप्रमुख प्रा.महेश मरकड, प्रा.सुनिल औताडे, प्रा.विश्वास घुटे, प्रा.राजकुमार गुजर, प्रा. संपदा उरणकर, प्रा.संकेत मोताळे, प्रा.राहुल जाधव, प्रा.अश्विनी गोरे, प्रा.योगेश्वर शिरसाट, प्रा.जगदिश दळे शैक्षणिक, संशोधन व सामाजिक क्षेत्रातील सहकारी, प्राध्यापक, संशोधक आणि मित्रपरिवाराकडून अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या या संशोधनात्मक उपक्रमामुळे उच्च शिक्षण क्षेत्रातील संशोधनातून तंत्रज्ञानाधारित नवोपक्रमाकडे वाटचाल करण्यास प्रोत्साहन मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## तपकीर गल्ली मित्र मंडळातर्फे सोमवारी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तपकीर गल्ली मित्र मंडळ, अहिल्यानगर यांच्या वतीने सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात सर्व गणेशभक्त, देणगीदार, नागरिक तसेच मंडळाच्या हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

मंडळाच्या वतीने सोमवारी दुपारी ४ वाजता श्री सत्यनारायण पूजेचे आयोजन करण्यात आले असून, त्यानंतर सायंकाळी ६ ते रात्री ८ वाजेपर्यंत गणात वाद्यपथकाचे विशेष वादन होणार आहे. हे कार्यक्रम महेश मंगल कार्यालय मागे, तपकीर गल्ली, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आले आहेत.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून समाजातील सर्व घटकांना एकत्र आणणारा आणि आपुलकी, बंधुभाव व सामाजिक एकोपा वाढविणारा उत्सव आहे. याच भावनेतून तपकीर गल्ली मित्र मंडळाच्या वतीने दरवर्षी विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. यंदाच्या गणेशोत्सवात मंडळाला देणगीदार, नागरिक आणि गणेशभक्तांकडून मिळालेल्या प्रेमळ सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सांगितले की, "मंडळ हे केवळ एक माध्यम आहे; बाप्पा आणि हा उत्सव आपल्या संपूर्ण परिवाराचा आहे. त्यामुळे प्रत्येक गणेशभक्ताचा सहभाग हा आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे."

# लोकसहभागातून तरटीफाटा शाळेचा कायापालट

## 'मिशन आपुलकी'तून डिजिटल क्लासरूम, सुशोभीकरणासह विविध भौतिक सुविधा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या शुभहस्ते लोकार्पण




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** वडगाव सावताळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तरटीफाटा येथे 'मिशन आपुलकी' उपक्रमांतर्गत लोकसहभाग व माजी विद्यार्थी संघाच्या सहकार्याने सुमारे दीड लाख रुपये खर्च करून शाळेचा कायापालट करण्यात आला आहे. शालेय रंगकाम, सुशोभीकरण, साउंड सिस्टीम, डिजिटल क्लासरूम, विविध भौतिक सुविधांचे तसेच मुख्याध्यापक कार्यालयाचे लोकार्पणही करण्यात आले. या सुविधांचे लोकार्पण शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या शुभहस्ते झाले.

शिष्यवृत्ती परीक्षा सन २०२५-२६ मध्ये शाळेतील १०० टक्के विद्यार्थी पात्र ठरल्याबद्दल पात्र विद्यार्थी तसेच मार्गदर्शक शिक्षिका व मुख्याध्यापिका श्रीमती ज्योती जऱ्हाड यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

> **मिशन आरंभ या उपक्रमामुळे शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल वाढला आहे तसेच नवोदय विद्यालयामध्ये देखील ६० पैकी ५८ विद्यार्थी ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधून निवडले आहे ही बाब कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी यासाठी कुसुमाग्रज वाचन अभियान तसेच रीडिंग बेल या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी सर्व शिक्षकांनी करावी.**
> **श्री भास्कर पाटील** (शिक्षणाधिकारी)

कार्यक्रमास प्रभारी गटशिक्षणाधिकारी विनेश लाळगे, केंद्रप्रमुख दीपक लोंढे, सरपंच संजय रोकडे, राजेंद्र रोकडे, पंढरीनाथ रोकडे, बाबासाहेब दाते, माजी केंद्रप्रमुख गोरक्ष रोकडे, भाऊसाहेब शिंदे, बाबासाहेब चौधरी आदी प्रमुख उपस्थित होते.

शाळेचा स्वच्छ व सुंदर परिसर तसेच विद्यार्थ्यांचा उत्साह पाहून समाधान व्यक्त करत, ग्रामस्थांच्या मागणीनुसार पुढील दोन दिवसांत शाळेसाठी एक शिक्षक उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन भास्कर पाटील यांनी दिले. यावेळी विनेश लाळगे, दीपक लोंढे, राजेंद्र रोकडे व भाऊसाहेब शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा प्रियंका रोकडे, उपाध्यक्षा योगिता जाधव, गुलाब रोकडे, अजय खोडदे, संदिप रोकडे, जगन्नाथ रोकडे, किरण साळुंके, विश्वनाथ रोकडे, तुकाराम साळुंके, सावळेराम आभाळे, मारुती साळुंके, जालिंदर शिंदे, सुनील जाधव, स्वप्निल गोसावी, दिलीप जाधव, आण्णा दाते, नामदेव जाधव, नितीन रोकडे, रोहिणी खोडदे, माधुरी जांभळकर, रोहिणी शिंदे, सोनाली मोहिते, अनिता जाधव, माया जाधव, प्रतिभा रोकडे, मनीषा रोकडे यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमास संतोष खामकर, योगेश धुमाळ,शरद शेरकर,अविनाश शिंदे, संदिप खंडागळे, संकल्प शिंदे यांच्यासह ग्रामस्थ, पालक व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन ज्ञानेश्वर जाधव यांनी केले, तर आभार श्रीमती ज्योती जऱ्हाड यांनी मानले.

# महाविद्यालयात सायबर सुरक्षा जनजागृती सत्र

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कॉलेज ऑफ नर्सिंग, अहिल्यानगर येथील वैद्यकीय-शल्य परिचर्या विभाग व महिला तक्रार निवारण कक्ष ( ) यांच्या वतीने, बी.पी.एच.ई. सोसायटीचे अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर यांच्या सहकार्याने तसेच महाराष्ट्र सायबर व क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ सप्टेंबर २०२६ रोजी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्यार्थी उपस्थित होते. ऐमन अत्तर यांनी आधुनिक आर्थिक फसवणूक, लक्ष्यित फसवणूक, प्रवेश व नोकरीच्या नावाखाली होणारी फसवणूक, उपकरणांची सुरक्षितता, संकेतशब्द आणि सायबर



कायद्याचे वास्तव याबाबत मार्गदर्शन केले. समृद्धी घोरपडे यांनी वास्तविक व आभासी अर्थव्यवस्था, कर्ज ॲप्समधील फसवणूक तसेच सामाजिक माध्यमांवरील धोके व सुरक्षिततेच्या उपाययोजनांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास वैद्यकीय संचालक डॉ. अभिजीत दिवटे, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. रामचंद्र पडळकर, प्राचार्य डॉ. प्रतिभा अरुण चांदेकर आणि उपप्राचार्य डॉ. योगिता औताडे यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विभागप्रमुख श्री. अमोल टेमकर, डॉ. निलेश म्हसके, वर्षा शिंदे, पूजा मोरे, प्रमोद सूर्यवंशी, रुशाली कुंजीर, प्रतीक्षा थोरात आणि सुदर्शन पाडेकर यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन रुशाली कुंजीर यांनी, तर आभार प्रदर्शन प्रतीक्षा थोरात यांनी केले.

सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणारे हे सत्र विद्यार्थ्यांसह सर्व उपस्थितांसाठी माहितीपूर्ण व मार्गदर्शक ठरले.



**खासदार निलेश लंके यांनी सोमवारी रात्री दिल्लीगेट तरुण मंडळाच्या गणेशोत्सवास सदिच्छा भेट दिली. यावेळी मंडळाचे अध्यक्ष श्री गिरीश जाधव तसेच नगरसेवक योगीराज गाडे आणि मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# पुण्यश्लोक तरुण मंडळाचे सामाजिक कार्य कौतुकास्पद - रामराव शिरसाठ

## पुण्यश्लोक तरुण मंडळात शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक रामराव शिरसाट यांच्या हस्ते महाआरती



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कसबे वस्ती येथील पुण्यश्लोक तरुण मंडळाच्या वतीने गेल्या नऊ वर्षांपासून गणेशोत्सव काळात तसेच वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. वृक्षारोपण, धान्यवाटप, रक्तदान शिबिर, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व दप्तर वाटप, स्वेटर वाटप आदी उपक्रमांच्या माध्यमातून मंडळाने सामाजिक बांधिलकी जपली आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून लोकमान्य टिळकांनी दिलेला सामाजिक एकोपा व समाजप्रबोधनाचा उद्देश साध्य करण्याचे काम पुण्यश्लोक तरुण मंडळ करीत असून, मंडळाचे कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक रामराव शिरसाठ यांनी व्यक्त केले.

पुण्यश्लोक तरुण मंडळाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अन्वर शेख, पोलीस कॉन्स्टेबल आदिनाथ जपकर, आबासाहेब चव्हाण, गणेश दहिफळे, धनराज राठोड, मंडळाचे अध्यक्ष निशांत दातीर, प्रा. बाळासाहेब शेंडगे, डॉ. शाम डौले, इंजि. डी. आर. शेंडगे, दत्तात्रय सुरम, प्रा. विष्णू बारगळ, सुनील भंडारी, रेणुकादास ठोंबरे, प्रा. चंद्रकांत वावळ, संजय चव्हाण, किशोर कसबे, संकेत शेंडगे, दत्तात्रय सोलाट, शोभा दातीर, प्रा. अश्विनी काळे, वनरक्षक सुनीता ठोंबरे, शैला बारगळ, कविता जतकर, मनीषा गुंजाळ, दिपाली चव्हाण, वृषाली कुलकर्णी, रेणुका सुरम, वैशाली देवकाते, रेखा डौले, भारती भंडारी, ज्योती वावळ, अश्विनी शेंडगे, उषा शेंडगे आदी उपस्थित होते.

शिरसाठ पुढे म्हणाले की, गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक उपक्रमांना चालना देणारा उत्सव ठरला पाहिजे. आजच्या काळात गरजू विद्यार्थी व नागरिकांना मदतीची गरज आहे. पुण्यश्लोक तरुण मंडळाच्या माध्यमातून राबविण्यात येणारे सामाजिक उपक्रम गरजूंसाठी उपयुक्त ठरत आहेत. अनेक मंडळे गणेशोत्सवाच्या काळात सामाजिक उपक्रम राबवितात; मात्र पुण्यश्लोक तरुण मंडळ वर्षभर विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देत आहे. त्यामुळे मंडळाने समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

मंडळाचे अध्यक्ष निशांत दातीर यांनी प्रास्ताविकात मंडळाच्या कार्याची माहिती दिली.गणेशोत्सवाबरोबरच नवरात्रोत्सव, कोजागिरी पौर्णिमा तसेच विविध महापुरुषांच्या जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रम राबविले जातात. वर्षभर रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, वही वाटप, दप्तर वाटप, स्वेटर वाटप यांसह विविध उपक्रम घेण्यात येतात. या माध्यमातून अनेक गरजू नागरिक व विद्यार्थ्यांना मदत करण्यात आली असून, भविष्यातही सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविण्याचा मंडळाचा मानस असल्याचे दातीर यांनी सांगितले.

# चि.आदित्य सतीश कोळगे यांची राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत चमकदार कामगिरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** शेवगाव तालुक्यातील तळणी येथील विद्यार्थी चि. आदित्य सतीश कोळगे याने अहिल्यानगर येथे युनिव्हर्सल अबॅकस अँड वैदिक मॅथ्स असोसिएशनच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले.

या स्पर्धेत आदित्यने अवघ्या ५ मिनिटांत १०० पैकी १०० गुण मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली. त्याच्या या नेत्रदीपक यशाबद्दल त्याला 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन' ट्रॉफी प्रदान करण्यात आली. आदित्यच्या या यशामागे त्याची मेहनत, सातत्यपूर्ण सराव आणि एकाग्रतेसोबतच त्याच्या शिक्षिका स्वाती घुले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्यने अबॅकस गणिताचा




नियमित सराव करून राज्यस्तरीय स्पर्धेत आपली गुणवत्ता सिद्ध केली.

तळणी गावासह शेवगाव तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आदित्यच्या या यशाची विशेष दखल घेतली जात असून, त्याच्यावर पालक, शिक्षक, नातेवाईक व ग्रामस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आदित्यच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# जलतारा प्रकल्पामुळे शेतकरी पाणीदार होऊ शकतो : डॉ. पुरुषोत्तम वायाळ

## वडुले खुर्द येथे जलतारा प्रबोधन कार्यशाळा उत्साहात; वर्षभरात २ हजार जलतारा प्रकल्प उभारण्याचा संकल्प

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–**"पाणी ही समृद्धीची पहिली पायरी आहे. पाण्याअभावी शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठी घट झाली असून, दुष्काळावर मात करण्यासाठी जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर होणे गरजेचे आहे. जलतारा प्रकल्पामुळे भूजल पातळी वाढण्यास मदत होऊन शेतकरी पाणीदार होऊ शकतो," असे प्रतिपादन डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी केले.

शेवगाव तालुक्यातील वडुले खुर्द येथे जलतारा प्रबोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेतकरी व ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना डॉ. वायाळ बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदर्शगाव वाघोलीचे सरपंच उमेश भालसिंग होते. डॉ. वायाळ पुढे म्हणाले की, जमिनीच्या उतारावर ५५६ फुटांचा खड्डा खोदून तो दगडाने भरून घेण्याची जलतारा पद्धत शेतकऱ्यांनी आपल्या शेतात राबवावी. या प्रकल्पामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होऊन शेतीची धूप कमी होईल, जमिनीत ओलावा टिकून राहील आणि मातीतील अन्नद्रव्य निर्माण करणारे उपयुक्त जिवाणू टिकून राहण्यास मदत होईल. परिणामी मातीचे संरक्षण होऊन पिकांची उत्पादकता वाढण्यास हातभार लागू शकतो. "गावाची भूजल पातळी वाढली तर त्याचा थेट सकारात्मक परिणाम शेतकऱ्यांच्या जीवनावर होईल. पाण्याचे संवर्धन झाले तर शेतीचे उत्पादन आणि शेतकऱ्यांचे



उत्पन्न वाढण्यास मदत होईल," असेही त्यांनी सांगितले.

**वडुलेखुर्दच्याविकासकामांचीपाहणी**

यावेळी डॉ. वायाळ यांनी वडुले खुर्द येथील ग्रामदैवत कानिफनाथ मंदिर, स्व. गोपीनाथ मुंडे पार्क, जिल्हा परिषद शाळा, संत वामनभाऊ विद्यालय, महादेव मंदिर तसेच स्वर्गभूमीची पाहणी केली. गावातील एकजूट आणि विकासकामांची दिशा पाहता वडुले खुर्दची आदर्श गावाच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून माजी सैनिक सुरेश आव्हाड मेजर यांनी कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट केला. शरद आव्हाड सर यांनी गावाचा परिचय करून दिला. वडुले खुर्दचे युवा नेतृत्व भाऊसाहेब प्रल्हाद आव्हाड यांनी उपस्थितांचे स्वागत करून, "येत्या एका वर्षात गावात २ हजार जलतारा प्रकल्प उभारण्याचा संकल्प" व्यक्त केला.

**वडुले-वाघोली पाणीदार करण्यासाठी एकत्रित प्रयत्न**

कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच उमेश भालसिंग यांनी वडुले खुर्द आणि वाघोली परिसर पाणीदार करण्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन केले. तसेच तरुणांनी व्यसनापासून दूर राहावे यासाठी वडुले खुर्द, वाघोली आणि आव्हाने बुद्रुक या गावांनी संयुक्तपणे प्रयत्न करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. यावेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास विनोद शेळके मेजर, शिवाजीराव बडे मेजर, सुबेदार मेजर भक्तराज केदार, सुबेदार मेजर ऋस्तुम रूईकर, सुरेश पाटेकर सेवानिवृत्त गटविकास अधिकारी, वाघोली-वडुले खुर्द विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन पांडुरंग दातीर, माजी चेअरमन शेषराव आव्हाड, जि.नि.मंडळाचे सदस्य बापूनाना पाटेकर, ज्ञानेश्वर उद्योग समूहाचे संचालक बबनकाका भुसारी, अंबादास कळमकर, भा.कि.मो. कचरुभाऊ चोथे, महादेव पाटेकर, तुषार आव्हाड, मोरे सर, सुरेश आव्हाड मेजर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमास वडुले खुर्द व वाघोली परिसरातील शेतकरी, युवक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सोमेश्वर शेळके यांनी केले, तर आभार रामदास पांढरे सर यांनी मानले. हवे असल्यास याच बातमीचे "दैनिकाच्या पहिल्या पानासाठी दमदार मथळा + उपमथळा + ५०० शब्दांची आवृत्ती" देखील तयार करून देऊ शकतो.

# समाजामध्ये नि:स्वार्थपणे सेवा करणाऱ्या ऋषितुल्यांचा सनातन धर्म सभेतर्फे सत्कार




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** समाजात अनेक सेवाभावी ज्येष्ठ नागरिक आहेत. आपले कार्य केवळ समाजसेवा म्हणून ते नि:स्वार्थपणे करत आहेत, करीत असतात. या कार्यामध्ये त्यांचा कोणताही स्वार्थ नसतो. आपण करीत असलेल्या कामाची ते कधी प्रसिद्धी करत नाहीत. असे नि:स्वार्थपणे कार्य करणारे ऋषितुल्य ज्येष्ठ नागरिक आजच्या काळात शोधणे कठीण आहे. सनातन धर्म सभेस ऋषिपंचमीनिमित्ताने त्यांचा सन्मान करण्याची भाग्य आम्हास मिळाले आहे. हे सर्व ऋषितुल्य झाकलेले माणिक-हिरे आहेत, असे प्रतिपादन सनातन धर्म सभेचे अध्यक्ष घनपाठी महेश रेखे यांनी व्यक्त केले.

ऋषिपंचमीदिनी समाजातील विविध क्षेत्रात कार्यरत सर्वश्री वेदमूर्ती सुधाकर जोशी, वेदमूर्ती बंडोपंत मुळे, अशोक कुरापाटी, दत्तात्रय भालेराव, योगेश परदेशी, सौ. अर्चना गावडे, मधुकर क्षीरसागर, अशोकराव करंदीकर आदींचा सत्कार संस्थेच्या श्री ज्ञानेश्वर सभागृह येथे संस्थेचे अध्यक्ष वेदमूर्ती महेश रेखे यांच्या हस्ते करण्यात आला. प्रथम सत्कारमूर्ती यांच्या हस्ते श्री गणेशाचे पूजन करून आरती करण्यात आली. वेदमूर्ती सर्वश्री सोमनाथ मुळे, निलेश धर्माधिकारी, चकोर मुळे, उमेश वाळूंजकर, बंडोपंत धर्माधिकारी यांनी मंत्रघोषाचे पठण केले. वेदमूर्तींच्या मंत्रघोषाने पवित्र मंगलमय वातावरणात ऋषितुल्य ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी वेदमूर्ती महेश रेखे म्हणाले की, अनंत काळापासून ऋषीपूजन केले जाते. आपले पूर्वीचे ऋषीमुनी आपल्या तपसाधनेने तत्वज्ञानी झालेले होते. हे सर्व एकत्र येऊन ब्रह्मसत्र करत असत. समाजातील सर्वांसाठी तत्वचिंतन करत असत, त्यांना स्वत:साठी काही करण्याची गरज नसताना केवळ समाजाला योग्य दिशा देण्यासाठी एकत्र येत असत. त्यासाठी ऋषिपंचमी हा दिवस आहे. सनातन धर्म सभेने आजच्या युगातील या ज्ञानी लोकांना निमंत्रित करून जो सन्मान दिला आहे तो त्यांच्या कार्याचा उचित गौरव असल्याचे प्रतिपादन वेदमूर्ती रेखे यांनी यावेळी व्यक्त केले.

प्रास्ताविकात संस्थेचे उपाध्यक्ष ह.भ.प. निळकंठ देशमुख म्हणाले की, हिंदू संस्कृतीमध्ये प्रत्येक तिथीचे फार महत्त्व आहे. पंचमीला तर धर्मात उच्च स्थान आहे, नागपंचमी, वसंतपंचमी, ऋषिपंचमी, रंगपंचमी या सर्व पंचमीच्या निमित्ताने आपण आपल्या ऋषीतुल्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करत असतोच. आपल्या धर्मात सात ऋषींना खूप महत्त्व आहे,

# माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत लोकसहभागातून फर्निचरसह संगणक लॅबची निर्मिती



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर तालुक्यातील माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत ग्रामस्थ आणि अप्रवा एनर्जी कंपनी यांच्या लोकसहभागातून एकूण सहा संगणक मिळाले असून त्यामुळे शाळेत संगणक लॅब तयार करण्यात आली आहे . अप्रवा कंपनीने या लॅबसाठी लोकसहभागातून संगणक आणि फर्निचर सुद्धा दिले आहे. नुकतेच या लॅबचे उद्घाटन सरपंच ,उपसरपंच ,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष,ग्रामस्थ ,पालक ,शिक्षक यांचे उपस्थितीत करण्यात आले.माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील उपक्रमशील शिक्षक सुनिल अडसूळ,राहुल व्यवहारे यांनी यासाठी विशेष प्रयत्न केले होते. सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे.त्यामुळे या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण मिळण्यासाठी संगणक मिळविणे गरजेचे होते.त्यासाठी शिक्षक सुनिल अडसूळ यांनी ग्रामस्थांना संगणक शिक्षकांचे महत्व पटवून दिले होते.या संगणक लॅबमध्ये एकूण सहा संगणक लोकसहभागातून मिळाले आहेत.यामध्ये लोकसहभागातून ग्रामस्थानी तीन संगणक आणि अप्रवा कंपनीने तीन संगणक असे एकूण सहा संगणक मिळाले आहेत. या संगणकाचा अध्ययन अध्यापनात वेळोवेळी वापर केला जातो. विद्यार्थी या संगणकाद्वारे विविध विषयांचे अध्ययन अध्यापन करत आहेत.यामुळे विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे धडे मिळत आहेत. विद्यार्थी संगणकावर विविध चित्रे काढतात , मजकूर टायपिंग करतात ,बेरीज ,वजाबाकी ,गुणाकार , भागाकार अशा गणिती क्रिया अचूकपणे करतात. त्यामुळे त्यांना संगणकाचा वापर विविध ठिकाणी कसा करावा याबाबत प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण मिळत आहे. विद्यार्थी संगणकावर केलेल्या क्रिया व विविध बाबी जतन करतात. माथनी येथील शाळेत विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी उपक्रमशील शिक्षक सुनिल अडसूळ,राहुल व्यवहारे यांनी लोकसहभागातून विविध भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा मिळविल्या आहेत.त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि शिक्षणासाठी फार मोठी मदत झाली आहे.या लोकसहभागाबद्दल केंद्रप्रमुख ,विस्तार अधिकारी,गटशिक्षणाधिकारी ,शिक्षणाधिकारी , संगमनेर डायट मधील अधिकारी यांनी शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

(पान १ वरून)

## समाजातील महत्त्वाचा घटक म्हणून सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान - उपमहापौर ॲड. धनंजय जाधव

महाआरती करण्याचा मान दिला, ही बाब कौतुकास्पद आहे. स्वच्छता कर्मचाऱ्यांचा आदर व सन्मान केल्याबद्दल सिद्धेश्वर तरुण मंडळ जंगुभाई तालीम ट्रस्टचे आम्ही सर्वजण आभार मानतो, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कार्याचा सन्मान

ऊन, वारा आणि पावसाची पर्वा न करता शहराची स्वच्छता राखणाऱ्या महापालिका सफाई कर्मचाऱ्यांच्या हस्ते गणपतीची महाआरती करून त्यांच्या सामाजिक योगदानाचा सन्मान करण्यात आला.याप्रसंगी महानगरपालिकेचे स्वछता निरीक्षक भांगरे, स्वछता निरीक्षक ऋषिकेश वाल्मिक, मुकदम चंदन सोनवणे, गौरव चावरे, अमर वैराळ, शिवम कोल्हे, गणेश गाडे, वेदांत खरारे आदी उपस्थित होते.

## नगरमधील विनायकनगर परिसरात गुटखा जप्त

असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे त्यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवाली पोलिसांच्या पथकाने अन्न व औषध प्रशासनाच्या () निरीक्षक एस. मुल्ला यांच्याशी संपर्क साधून घटनास्थळी संयुक्त छापा टाकला.

पोलिसांनी घटनास्थळी सुझुकी ॲक्सेस मोपेडवर पांढऱ्या रंगाच्या गोणीसह थांबलेल्या अन्सार अबरार सय्यद (वय ३३ वर्षे, रा. दर्गा दायरा, जि.प. शाळेजवळ, मुकुंदनगर) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडील गोणीची झडती घेतली असता, त्यात शासनाने प्रतिबंधित केलेला विमल गुटखा आणि व्ही-१ तंबाखूचा साठा आढळून आला. पोलिसांनी गुटख्याचा साठा आणि वाहतुकीसाठी वापरलेली दुचाकी जप्त केली आहे.

याप्रकरणी पोकॉ सुरज कदम यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात बीएनएस आणि अन्न व सुरक्षा मानके अधिनियम २००६ च्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर अधीक्षक वैभव कलबुर्मे, उपविभागीय अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, उपनिरीक्षक दीपक मेढे पोहेकॉ विनोद बोरगे, अतुल लाटे, सचिन लोळगे, रोहित ठोंबे, बागवान यांनी केली.